(२१) ३८

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

गुरुवार दिनांक २८ जुलै १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या २१ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची २१ वी बैठक दिनांक २८ जुलै १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] डॉ. शंकर वामन मटकर | सभापती. |
| २] श्री. हेमराज शहा | उपसभापती. |
| ३] श्री. अशोक लाल | मुख्य अधिकारी. |
| ४] श्री. व्ही. बी. वरसकर | सदस्य. |
| ५] श्री. कमलाकर शर्मा. | -"- |
| ६] श्री. रॉकी कास्टो | -"- |
| ७] श्री. चेतन शहा | -"- |
| ८] श्री. विवेक भर्तु | -"- |
| ९] श्री. फारूख मन्सुरी | -"- |
| १०] श्री. गजेंद्र लष्करी | -"- |
| ११] श्री. मोहम्मद आझम खान | -"- |
| १२] श्री. पोतदार, प्रमुख अभियंता मुंबई महानगरपालिका याचे प्रतिनिधी. | |
| १३] उपकर संचालक व संकलक, मुंबई महापालिका | निमंत्रित. |

मा. उपसचिव श्री. यादवराव कांबळे, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग ह्यांनी विधानसभा अधिवेशन असल्यामुळे सभेस उपस्थित राहू शकत नाही असे कळविले.

सभेस आरंभ करण्यापूर्वी मा. सभापती डॉ. शंकर मटकर यांनी सभागृहास दि. १४ जुलै १९९४ रोजी दक्षिण परिमंडळातील ९८-१०२ अब्दुल मंजील अली उमर स्ट्रीट पायधुनी ही इमारत कोसळून दु:खद घटना घडल्याचे सभागृहास अवगत करुन दिले व त्यात मृत पावलेल्या व्यक्तींना सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहिली व त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

ठराव क्रमांक :- २१/१४५
===================

दिनांक १४ जुलै १९९४ रोजी दक्षिण परिमंडळातील "सी" विभागातील ९८-१०२ अब्दूल मंजील अली उमर स्ट्रीट पायधुनी येथील इमारत कोसळून झालेल्या अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींबद्दल तिव्र दु:ख व्यक्त करुन त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी असा ठराव सर्वानुमते संमत करण्यांत आला.

तद्नंतर मा. सभापती यांच्या अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला.

बाब क्रमांक :- २१/१ :- मंडळाच्या २० व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त स्थायी करणेबाबत.
================

दिनांक २७.६.९४ रोजी झालेल्या मंडळाच्या २० व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त पृष्ठ क्रमांक १ ते २३ वर सादर केला आहे. सदर कार्यवृत्तांतावर चर्चा करताना मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मं. यांनी पृष्ठ क्रमांक १३ आणि १४ वरील बाब क्रमांक २०/६ अंतर्गत मंजूर केलेल्या ठरावावर मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचेशी झालेल्या चर्चेची थोडक्यात कल्पना उपस्थितांना दिली.

निवासी गाळ्याकरीता अधिकचे क्षेत्रफळ देताना रु. ५००, ७५०, १००० प्रति चौ.फू. या प्रमाणे किंमत आकारावी असा ठराव मागील बैठकीत सर्वानुमते मंजूर करण्यांत आला होता. त्याबाबत मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचेशी चर्चा करतेवेळी त्यांनी असे सुचित केले की, सदर वाढीव आकार हा प्रचलित बाजारभावाने आकारावा, तरी मंडळाने घेतलेल्या निर्णयावर फेरविचार करावा व ही बाब प्राधिकरणासमोर विचारार्थ ठेवणे इष्ट होईल असे मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी मत दिले.

यावर मा. सभापती, उपसभापती व सदस्य श्री. चेतन शहा, शंकरराव पिठले इ. नी. प्रदीर्घ चर्चा केली. मा. सभापतींनी सांगितले की, मुंबई शहरातील निवासी गाळ्यांचा बाजारभाव हा त्या त्या भागानुसार कमी जास्त आहे, त्यामुळे जर

...३/...

वाढीव चटई क्षेत्रफळ देताना बाजारभावाने अधिमूल्य आकारल्यास तो एकप्रकारचा भाडेकरूंवर अन्याय होईल. कारण अधिकचे क्षेत्रफळ हे मंडळाने बांधलेल्या पुनर्रचित इमारतीत जुन्या गाळया एवढे क्षेत्रफळ असलेले गाळे काही तांत्रिक अडचणींमुळे बांधू शकत नसल्याने देणे भाग असते. तसेच सध्या मंडळाच्या संक्रमण शिबिरात राहणारे बृहत्सूचीनुसार पात्र गाळेधारकांची सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांना अधिकच्या क्षेत्रफळासाठी बाजारभावाने अधिमूल्य भरणे शक्य होईल किंवा नाही याबाबत साशंकता आहे. यावर सर्व सदस्यांनी असे मत दिले की, अधिकच्या क्षेत्रफळाकरिता अधिमूल्य आकारताना असे धोरण अवलंबविण्यांत यावे की, जेणेकरुन रहिवाश्याचे हित आबाधित राहील. म्हणजेच अधिमूल्य आकारताना व्यापारी दृष्टिकोन अंगारता कामा नये. यावर, मा. सदस्य श्री. शंकरराव पिळा इयांनी ही बाब स्थायी न करता पुढील बैठकीत सविस्तर चर्चा करावी असे सुचविले. परंतु यावर मा. सभापती डॉ. मटकर इयांनी सभागृहास असे सांगितले की, मागील बैठकीत सर्वानुमते जे निर्णय घेण्यांत येतात, त्यांच्या स्थायीकरणाची वाट न पहाता घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही/अंमलबजावणी ताबडतोब करण्यांत यावी असे ठरले होते. तदनुसार सदरहू विषयाबाबत अधिमूल्य आकारताना जे टप्पे [स्लॅब] मंजूर करण्यांत आले होते, त्याच्या आधारे संबंधित अधिका-यांनी काही प्रकरणी रहिवाश्यांकडून अधिकचे अधिमूल्य आकारुन त्यांना पुनर्रचित इमारतीत गाळे वितरित करण्यांत आलेले आहेत.

यावर मुख्य अधिकारी/दु. व पु. मंडळ यांनी असे सुचविले की, आपण जो पूर्वी निर्णय घेतलेला आहे तो इयापुढे स्थगीत ठेवू व मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचा जो निर्णय येईल त्याप्रमाणे याबाबत पुढील कार्यवाही करू. यावर मा. उपसभापती श्री. हेमराज शहा यांनी प्रतीपादन केले की, आम्ही जो निर्णय घेतला आहे त्यावर जर प्राधिकरणास काही बदल करावयाचा असेल तर तो लेखी स्वरुपात आल्यावर त्यावर निर्णय घेता येईल तसेच आपल्यापैकी काही सदस्यांनी मा. उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रत्यक्ष भेटून याबद्दलची कल्पना देवू व त्यात रहिवाशांच्या हिताचा विचार व्हावा अशी विनंती करू.

३२०

: ४ :

शेवटी सर्वानुमते असे ठरले की, मागील बैठकीत अधिमुल्य आकारण्याकरिता जो निर्णय घेण्यांत आलेला आहे, तोच कायम ठेवून त्यास स्थायी करावे व तद्नुसार अंमलबजावणी करण्यांत यावी. याबाबत सभापतींनी, मुख्य अधिकारी/मुं. इ. दु. व पु. मं. ह्यांना विनंती केली की, मा. उपाध्यक्ष/प्रा. ह्यांना मंडळाने घेतलेल्या निर्णयाची कल्पना यावी व त्यावर मा. उपाध्यक्ष/प्रा. ह्यांचे काय म्हणणे आहे, त्याची माहिती पुढील बैठकीत सभागृहापुढे ठेवावी.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. विवेक भर्तु ह्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मंडळाच्या अधिका-यांनी पावसाळयापूर्वी सर्वेक्षण [प्री-मान्सून सर्व्हे] केलेला होता. त्यानंतर काही इमारती कोसळण्याचे प्रकार घडल्याने पुन्हा इमारतींचे सर्वेक्षण मंडळाच्या अभियंत्यांमार्फत सुरू केलेले आहे, परंतु यामुळे बराच अधिकारी वर्ग अडकून पडला असल्यामुळे ज्या कामांची अंदाजपत्रके तांत्रिक समितीने मंजूर केली असुनसुध्दा प्रत्यक्ष कामास सुरुवात करता येऊ शकत नाही, त्यामुळे अशा इमारतीतील रहिवाश्यांच्या तक्रारी त्यांच्याकडे सारख्या येत असतात. तर त्याबद्दल त्यांनी असे विचारले की, हा जो काही सर्व्हे चालू आहे त्याकरिता अतिरिक्त अधिकारी वर्ग नियुक्त करणार किंवा कसे.

यावर खुलासा करतांना मुख्य अधिकारी/दुवपुमं. ह्यांनी सांगितले की, त्यांना दोन दिवसापूर्वीच मिळालेल्या आकडेवारीनुसार ती वार्डात १७०० इमारतीं-पैकी जवळजवळ ७०० इमारतींचे सर्वेक्षण पूर्ण झालेले असून, उर्वरित इमारतींचे सर्वेक्षण येत्या ७ ते ८ दिवसांत पूर्ण होईल असे वाटते. याबाबत त्यांनी सांगितले, मा. उपाध्यक्ष/प्रा. ह्यांच्या सांगण्यावरून आपण पावसाळया-नंतरचे सर्वेक्षण सुरु केलेले आहे, तरी देखील सर्वच इमारतींचे

सर्वेक्षण करणे शक्य होणार नाही, यावर मा. सदस्य श्री. भर्तु इयांनी एक जाहिर निवेदन प्रसिध्द करुन रहिवाश्यांना त्यात असे आवाहन करावे की, ते रहात असलेल्या इमारतींची दुरुस्ती आवश्यक असल्यास त्यांनी मंडळास कळवावे, त्यामुळे मंडळाचे अधिकारी प्रत्यक्ष इमारतीची पहाणी करुन तिच्या दुरुस्तीबाबत योग्य तो निर्णय घेतील. यामुळे मंडळाच्या अधिका-यांचा वेळ वाया न जाता इतरही महत्त्वाची कामे ते करु शकतील. तसेच जाहिर निवेदनात किंवा प्रत्यक्ष जागेवर जाउन जुन्या इमारतीतील रहिवाश्यांना प्रत्येक मजल्यावर कमीत कमी वजन ठेवण्यास उद्युक्त करावे, तसेच इतर सुरक्षिततेची उपाययोजना जसे पॅसेजमध्ये पाणी साठविण्याच्या टाक्या न ठेवणे, इतर अवजड वस्तूंचा साठा न करणे इ. बाबत मार्गदर्शक सूचना द्याव्यात.

याबाबत मा. सदस्य श्री. फारुख मन्सूरी व श्री. रॉकी कास्टो इयांनी असे निदर्शनास आणून दिले की, नुकत्याच ज्या इमारती कोसळून अपघात झाले, त्या पार्श्वभूमीवर काही समाजकंटक लोकांकडून इमारतीची सध्यस्थिती चांगली असूनसुध्दा ती इमारत धोकादायक आहे व केव्हाही कोसळेल अशी भिती रहिवाश्यांमध्ये पसरवली जात आहे. तरी यावर ताबडतोब कारवाई करावी असे त्यांनी सूचविले.

यावर मा. सभापतींनी अशा सूचना केल्या की, जोपर्यंत मंडळाच्या अधिका-यांनी इमारत तांत्रिक दृष्टया कमकुवत असून राहण्यास अयोग्य असल्याचे प्रमाणपत्र दिल्याशिवाय कोणतीही इमारत खाली करता कामा नये, एखादी इमारत राहण्यास असुरक्षित ठरविल्यास ताबडतोब खाली करुन घेउन त्यांना संक्रमण शिबिरात हलविण्याची कार्यवाही करावी.

यावर मा. सदस्य श्री. शंकरराव पिल्ले इयांनी असे निदर्शनास आणून दिले की, जुन्या उपकरप्राप्त इमारतीत जी अनधिकृत कामे केली जातात, त्यामुळे इमारत कोसळण्याचे

प्रकार घडतात. यावर आळा घालण्यासाठी अनधिकृत बांधकामे ताबडतोब हटविली पाहिजेत.

याबाबत मा. सभापतींनी असे प्रतिपादन केले की, अनधिकृत बांधकामे पाडण्याचे काम हे मुंबई महापालिकेचे असून, मंडळामार्फत केवळ अनधिकृत बांधकामे कोठे आहेत याची माहिती महापालिकेकडे पुरविली जाते. अनधिकृत बांधकामाचा प्रश्न ब-याच काळापासून प्रलंबित असून याबाबत त्यांनी असे सूचविले की, संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी ज्या ठिकाणी उपकरप्राप्त इमारतीत अनधिकृत बांधकाम झाले आहे, त्याची तपशीलवार माहिती महापालिकेच्या विभाग अधिका-यांना पाठवावी व त्याची एक प्रत मुख्य अधिकारी/दुवपुमं. हयांना द्यावी, जेणेकरुन मुख्य अधिकारी/मुंइदुवपुमं हे त्यांच्या स्तरावर मा. सभापती व सदस्य हयांच्या उपस्थितीत महापालिका आयुक्त हयांच्याबरोबर संयुक्त बैठक घेतील , जेणेकरुन अनधिकृत बांधकामे त्वरित हटविणे-बाबत ठोस कार्यवाही करणे सोपे जाईल. तसेच म्हाडा अधिनियमात असलेल्या तरतूदीच्या आधारे पोलीस आयुक्तांकडे तक्रार करुन याबाबत मंडळाच्या अधिका-यांनी पाठपुरावा करावा जेणेकरुन जनमाणसात जी मंडळाची मानहानी होते, ती कमी होऊन मंडळाची बदनामी थांबण्यास मदत होईल.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. कमलाकर शर्मा हयांनी ज्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले जाते, त्यात कोणत्या कामांचा समावेश केलेला आहे, हे दर्शविणारा दुरुस्ती कामाच्या नकाशाची प्रत संबंधित कार्यकारी अभियंता कडून रहिवाश्यांना दिली जात नाही. याबाबत त्यांनी ते स्वत: रहात असलेल्या "नीलम महल" इमारतीचे उदाहरण दिले. ही माहिती न दिल्याने भाडेकरुंमध्ये दुरुस्ती कामाबद्दल संभ्रमता निर्माण होते, अशी माहिती न दिल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. यावर उपमुख्य अभियंता श्री. दुराणी हयांनी इमारतीची दुसरी संयुक्त पहाणी करतेवेळी भाडेकरु/रहिवाशी किंवा त्यांचे प्रतिनिधींना, इमारतीचे दुरुस्तीचे कोणते काम हाती घेणार

..७/..

आहेत, त्यांची पुरेपुर कल्पना मंडळाचे अधिकारी देतात.
तसेच श्री. शर्मा ह्यांनी इमारतीच्या चौकात किंवा जिन्याखाली बिगर निवासी दुकाने किंवा गाळे काढले जातात ते कोणाच्या परवानगीने काढले जातात यावर मा. सभापतींनी सांगितले की, ही बाब मंडळाच्या अखत्यारित येत नाही. मंडळ केवळ दुरुस्ती करते, निवासी गाळ्याचे अनिवासी गाळ्यात रूपांतर करणे, इ. बाब ही भाडेकरू, मालक व महापालिका ह्यांच्या कक्षेतील आहे. यावर मा. सदस्य श्री. भर्तु व श्री. पिटला ह्यांनी निवासी गाळ्याचे रूपांतर अनिवासी गाळ्यात करण्याची परवानगी देण्यापूर्वी महापालिकेने मंडळाचे "ना हरकत प्रमाणपत्र" घेतले पाहिजे असे सांगितले. कारण अनिवासी गाळा करताना कधीकधी अतिरिक्त भार इमारतीवर पडण्याची शक्यता असून त्यामुळे अपघात होण्याचा धोका संभवतो. याबाबत बोलताना श्री. पोतदार कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव [दु. व पु. ], महापालिका ह्यांनी खुलासा केला की, उपकरप्राप्त इमारतीत मंडळाचे "ना हरकत प्रमाणपत्र" नसल्यास निवासी गाळ्याचे अनिवासी गाळ्यात रूपांतर करण्यास परवानगी दिली जात नाही.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. मोहम्मद आझम खान ह्यांनी बृहत्सूचीवरील गाळेधारकांना मंडळाच्या पुनर्रचित इमारतीतील अतिरिक्त गाळे वाटपासंदर्भात मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या गलथान कारभारासंदर्भात अतिशय तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली, त्यांनी असा आरोप केला की, सामान्य गाळेधारकांना मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून नीट वागणूक दिली जात नाही त्यांना उडवाउडवीची उत्तरे देऊन वाटेला लावले जाते, याउलट जे दलाल म्हणून येतात त्यांना प्राधान्य देऊन त्वरित वितरण केले जाते. त्यास मा. उपसभापती व सदस्य श्री. पिटला व भर्तु ह्यांनीही दुजोरा दिला.

यावर उत्तर देताना सहमुख्य अधिकारी/दुवपुमं. ह्यांनी मा. सदस्य ह्यांनी केलेल्या तक्रारीत काही तथ्य नसल्याचे सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांच्या

....८....

ऑफिसात सगळयांना सारख्याच प्रमाणात प्रवेश दिला जातो. बाहेरील अभ्यागतांना भेटण्याकरिता दु. २.०० ते ४.०० ही वेळ दिलेली आहे.

वरील चर्चेच्या अनुषंगाने मा. सभापतींनी असे सूचविले की, बृहत्सूचीवरील गाळेधारकास वाटपासंदर्भात सर्वसामान्य जनता, त्याच बरोबर सदस्यही नाराज आहेत त्याकरिता त्यांनी मुख्य अधिकाऱ्यांना विनंती केली की, दु. २.०० वाजे-पर्यंत बाहेरील कोणाही व्यक्तीस प्रवेश देऊ नये, त्यामुळे लोकांची खोळंबलेली कामे होतील तसेच शक्यतोवर संबंधित अधिकाऱ्यांनी २.०० ते ४.०० या वेळात कार्यालयात हजर राहण्याकडे कटाक्ष ठेवावा. यावर मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, त्यांच्याकडे बाहेरील अभ्यागत [व्हिजिटर्स] हे रात्रौ ८.०० वाजेपर्यंत सुध्दा येतात, ते त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा सन्मा. सदस्यांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांवर जे आरोप केले आहेत, ते बरोबर नाही. कारण बृहत्सूचीवरील गाळेधारक जे आज १५ ते १८ वर्षापासून संक्रमण शिबिरात रहात आहेत, त्यांच्याकडे किंवा मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे देखील त्यांच्या जुन्या क्षेत्रफळाविषयी ठोस अशी माहिती उपलब्ध नसते. तसेच काही ठिकाणी तर संक्रमण शिबिरात जुन्या गाळेधारकाऐवजी दुसरेच कोणीतरी व्यक्ती रहात असल्याचे आढळून येते. या सर्व त्रूटींचा योग्य रितीने अभ्यास करुन त्यावर योग्य निर्णय घेणे की, जेणेकरुन गाळेधारकावर अन्याय होणार नाही, यास थोडाफार वेळ लागणे क्रमप्राप्तच आहे.

बाब क्रमांक : २१.२
===============

विषय :- अनुपालन अहवाल.

पृ. क्र. २५ ते ३७ वर उपमुख्य अभि. [पुनर्र. ] ह्यांनी पुनर्बांधणी अजिबात शक्य नाही अशा १२० इमारतींची यादी

...९...

अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

सदर यादीवर मंडळाने काहीही भाष्य न करता स्वीकृती दिली.

पृ. क्र. ३९ वर सहमुख्य अधिकारी श्री. जग्यासी ह्यांनी श्री. चेतन शहा ह्यांनी मागील बैठकीत, पुनर्बांधणी योजनेतून उपलब्ध होणा-या अतिरिक्त गाळ्यांची विक्री करण्यासंबंधीच्या सूचनेस अनुसरुन अनुपालन अहवाल सादर केलेला आहे. श्री. जग्यासी ह्यांनी असे म्हटले आहे की, मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणामध्ये असा निर्णय दिला आहे की, उपकर निधीतून बांधलेल्या इमारतीतील गाळे फक्त उपकरप्राप्त इमारतीमधील रहिवाश्यांनाच वाटप करण्यात यावे अन्य कोणत्याही कारणासाठी वापरु नयेत, यास्तव मा. सदस्य श्री. चेतन शहा ह्यांनी केलेली सूचना संयुक्तीक वाटत नाही असे मत दिलेले आहे. यावर श्री. चेतन शहा ह्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्रीमती सुजाता मनोहर ह्यांनी मंडळाच्या "रामलक्ष्मण" ह्या पुनर्रचित इमारतीत ऑफिसकरिता गाळे वापरु नयेत असा निर्णय दिला होता ह्याचा अर्थ असा निघत नाही की, अतिरिक्त गाळ्यांची विक्री करु नये. यावर मुख्य अधिकारी ह्यांनी उपमुख्य अभियंता [पुनर्र.] ह्यांना वरील संदर्भात मा. न्यायमूर्ती श्रीमती सुजाता मनोहर ह्यांनी दिलेल्या निकाला संदर्भात विधी सल्लागार/प्रा. ह्यांचे मत घेऊन ते पुढील बैठकीत सभागृहासमोर ठेवावे असे सूचविले.

पर्तता
उपमुख्य अभि. [पुनर्र.]

बाब क्रमांक :- २१/३
=================

विषय :- दि. २४. ५. ९४ रोजी झालेल्या ५व्या तांत्रिक समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तान्त अवलोकनार्थ व माहितीस्तव पृ. क्र. ४३ ते ८५ वर सादर केलेला आहे. त्यास सर्वानुमते मंडळाने अनुमती व स्वीकृती दिली.

========

चर्चेच्या ओघाओघात "टीओटी" प्रकरणे स्वीकारण्याची

जी ३१ जुलै १९९४ पर्यंत मुदत आहे ती वाढवून ३१ डिसेंबर १९९४ पर्यंत करावी असे मांडण्यात आले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव क्र. :- २१/१४६
===================

टिओटी प्रकरणे स्वीकारण्याची मुदत दि. ३१ डिसेंबर १९९४ पर्यंत वाढविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

बाब क्र. २१/४
============

प्र. क्र. ७७ ते ९९ वर भाडेकरू/रहिवाश्यांच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता खालील मालमत्तेचे भूसंपादन प्रस्ताव सादर केलेले आहेत.

१] इमारत क्रमांक ३१९, रणछोडदास टेरेस या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सर भालचंद्र रोड, एफ एन-विभाग, मुंबई - १९ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित रणछोडदास टेरेस सहकारी गृहनिर्माण संस्थेकरीता संपादन करण्याचा प्रस्ताव.

२] इमारत क्रमांक २५७, २६३ शांतीसदन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लॅमींग्टन रोड "डी" विभाग, मुंबई - ४०० ००७ येथील भूखंड त्यावरील इमारतीत नियोजित शांतीसदन सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

उपरोक्त दोन्ही प्रस्तावांना सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव क्रमांक : २१/१४७
=====================

इ. क्र. ३१९, रणछोडदास टेरेस या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सर भालचंद्र रोड, एफ/एन् विभाग, मुं. १९ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह रहिवाश्यांच्या नियोजित रणछोडदास टेरेस सह. गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक :- २१/ १४८

इ.क्र.२५७, २६३, शांतीसदन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लॅमिंग्टन रोड "डी" विभाग, मुंबई - ७ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह रहिवाश्यांच्या नियोजित शांतीसदन सह.गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

तद्नंतर मा.सभापती, उपसभापती, सदस्य व सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यांत आले.

सही/-
निकाअ /मुंइदुवपुमंडळ.

सही/-
मुख्य अधिकारी/मुंइदुवपुमंडळ.

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

बुधवार दिनांक १०.८.९४ रोजी झालेल्या पुनर्रचित मंडळाच्या २२ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची २२ वी बैठक बुधवार दि. १०.८.९४ रोजी दुपारी ३.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह तिसरा मजला येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१] श्री. मनोहर विठोबा कोकाटे, सभापती.
२] श्री. अशोक लाल, मुख्य अधिकारी/दु. व पु.
३] श्री. सुनिल कर्वे, सदस्य.
४] श्री. राजा चव्हाण, सदस्य.
५] श्री. [illegible] धुमाळे, सदस्य.
६] श्री. हेमंत मंडलिक, सदस्य.
७] श्री. रविंद्र कोटकर, सदस्य.
८] श्री. मोहन देसाई, सदस्य.
९] डॉ. माला पाटील, सदस्य.
१०] श्री. कृष्णा गेणू कांबळे, सदस्य.
११] श्रीमती सरोज कपाडिया, नगरसेविका, सदस्य.

मा. सभापती श्री. मनोहर विठोबा कोकाटे ह्यांच्या अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. मा. सदस्य, मुख्य अधिकारी व मंडळाचे संबंधित अधिकारी ह्यांचे स्वागत करण्यात आले.

मा. सभापती, श्री. मनोहर कोकाटे ह्यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या नवीन सहकारी सदस्यांची ओळख करुन दिली. व मुख्य अधिकारी/दुवपुमंडळ ह्यांना दु. व पु. मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाविषयी सभागृहास थोडक्यात माहिती देण्याची विनंती केली.

मुख्य अधिकारी/दु. व पु. मं. ह्यांनी उपस्थित मा. सभापती व सदस्य ह्यांचे स्वागत केले व त्यांचे मार्गदर्शन मंडळाच्या कामकाजास मोलाचे ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

पुढे मुं. इ. दु. व पुनर्रचना मंडळाच्या कामकाजाविषयी माहिती देताना मुख्य अधिकारी/दु. व पु. मं. ह्यांनी उपस्थित अधिकारी [illegible] ओळख व त्यांच्या अखत्यारित येत असलेल्या कामकाजाविषयीची माहिती नवीन मंडळास दिली.

...२/...